# " आंस तरुणीची मला "

आंस तरुणीची मला....
श्रांत, क्लांत, क्षणी परत तो जेव्हा मी विसाव्याला ।
अन् ऐकतों गाणी फिल्मी, मन रमवायाला ।
फिरवतो नजर अवतीभवती, बाल्कनींत, गच्चींत ।
दिसें कुणी नवयौवना, श्रृंगार करता नयना ।।

आंस तरुणीची मला....

शांत, एकांत क्षणी बसतो जेव्हा मी विसाव्याला ।
अन् बघतो तापी किनारी, मन रमवायाला, ।
फिरवतो नजर अवतींभवती, बोटींत, क्वचित् ।
दिसें कुणी नवयौवना, विहार करता नयना ।।

आंस तरुणीची मला....

श्रांत, क्लांत क्षणी टेकतो जेव्हा मी विसाव्याला ।
अन् घेतो कंपनींत 'अर्धी,' मन रमवायाला ।
फिरवतो नजर अवतीभवती, गाडींत, खचित्, ।
दिसें कुणी नवयौवना, प्यार करता नयना ।।

आंस तरुणीची मला....

श्रांत, क्लांत क्षणी पसरतो, जेव्हा मी विसाव्याला ।
अन् पाहतो स्वप्ने इंद्रधनुषी, मन रमवायाला ।
फिरवतो नजर अवतीभवती, खोलींत, कदाचित् ।
दिसें कुणी नवयौवना, इन्तजार करता नयना ।।

कवी :- श्री. मधुसूदन दत्तात्रय लेले.